ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्तेवरील कर आकारणीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः पीआयएल-२६१४/प्र.क्र.३३९/पं.रा-४
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड
मुंबई ४०० ००१
तारीख: ०२ जानेवारी, २०१६

वाचा : १. शासन परिपत्रक क्र. पीआयएल-२६१४/प्र.क्र.३३९/पं.रा-४ दि. ०६ एप्रिल,२०१५
२. शासन अधिसूचना क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २०१५.

प्रस्तावना

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर आणि फी नियम १९६० अंतर्गत ग्रामपंचायतींच्या हद्दीतील बांधकामांवर इमारतीच्या भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्यात येत होती. शासनाने दि.३ डिसेंबर, १९९९ रोजी अधिसूचना पारित करुन भांडवली मुल्यावर करण्यात येणा-या कर आकारणीऐवजी क्षेत्रफळावर आधारित कर आकारणी करण्याबाबत सुधारणा केली. सदर अधिसूचनेस मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.६०/२००१ द्वारे आव्हानित केले होते. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायायल, मुंबई यांनी आदेश पारित केले असून मा.उच्च न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने अशाच प्रकरणात वेळोवेळी दिलेल्या न्याय निर्णयांचा हवाला देऊन दिनांक ३ डिसेंबर, १९९९ च्या अधिसूचनेतील महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियमातील नियम २ ते ४ आणि ५(अ) हे रद्दबातल केले असल्याने संदर्भाधिन वाचा क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता कर आकारणीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली होती.

शासन परिपत्रक:-

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मध्ये सुधारणा करण्यात येऊन भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी करण्याबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २०१५ ची अधिसूचना क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ प्रसिध्द करण्यात आली असून तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर कायदे / नियम या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्याकरिता संदर्भाधिन वाचा क्र. १ च्या शासन परिपत्रकान्वये ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता कर आकारणीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत आहे. संदर्भाधिन वाचा क्र. २ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी .

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११४१५२५००१९२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R Bankar

Digitally signed by Sanjay R Bankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, cn=Sanjay R Bankar
Date: 2016.01.14 15:31:12 +05'30'

(संजय बनकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा.मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व सहसचिव / उपसचिव (ग्रामविकास विभाग, मंत्रालय)
७. सर्व उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय.
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१०.सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं/सा.प्र.वि)
११.कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष (ग्रा.वि.व ज.सं.वि.) बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१२.कक्ष अधिकारी, माहिती तंत्रज्ञान कक्ष ,(ग्रा.वि. व ज.सं.वि) ,बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१३.निवड नस्ती, कार्यासन पं.रा-४.